यूथ डेव्हलपमेन्ट को-ऑप.बँक लि.,कोल्हापूर.
Youth Development Co-op. Bank Ltd., Kolhapur.
Head office -"Poornima" F-2 First Floor, 1429/G, Near Sambhaji Bridge, Laxmipuri, Kolhapur. 416 002.
Phone No. - 0231 - 2550120, 21, 22, 23 Fax No.- 0231- 2642026. E-mail : youth_bank@dataone.in
www.youthbank.co.in

REF. No. : DATE :

# ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

या बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, सन २०१७-१८ साल अखेरची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ०८-०९-२०१८ रोजी सकाळी ठिक ११-०० वाजता आचार्य विद्यानंद संस्कृती भवन, ७/ई भाऊसिंगजी रोड, महावीर कॉलेज परिसर, कोल्हापूर –४१६ ००३ येथे भरणार असून, त्यात खालील विषयांवर विचार विनिमय करणेत येणार आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दिनांक २४-०९-२०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०१७-२०१८ सालचा वार्षिक अहवाल,ताळेबंद पत्रक,नफा तोटा पत्रक यास मंजुरी देणे.
३) सन २०१७-२०१८ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व तो स्विकृत करणे तसेच सन २०१६-२०१७ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
४) सन २०१८–२०१९ सालचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे आणि सन २०१७–२०१८ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५) सन २०१८–२०१९ करीता सभासद नियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६) सन २०१८–२०१९ करीता समवर्ती लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
७) बँकेचे संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या कर्जांची नोंद घेणे.
८) महाराष्ट्र शासनाने मुदत वाढ दिलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत (ओटीएस) तडजोड केलेल्या खात्यांच्या कर्जांची माहिती घेणे.
९) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

कोल्हापूर.
दिनांक :२३-०८-२०१८

संचालक मंडळाच्या आदेशावरुन,

**बेंजामिन मा. त्रोंडकर**
**कार्यकारी संचालक**

**<u>सभासदांना सूचना :-</u>**

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास या सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी १२-०० वाजता सुरु होईल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२) सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना व प्रश्न असतील तर बँकेच्या प्रधान कार्यालयात दिनांक ०१-०९-२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा रितीने पाठवावेत.
३) सभासदांचे भाग प्रमाणपत्र तयार असून त्यांनी ते प्रधान कार्यालयातून घेऊन जावे.
४) बँकेच्या संकेत स्थळावर www.youthbank.co.in तसेच बँकेच्या प्रधान कार्यालय व सर्व शाखांमध्ये बँकेच्या वार्षिक अहवालाची प्रत उपलब्ध आहे.
५) पोटनियमानुसार प्रत्येक सभासदाने पाच वर्षातून किमान एकदा वार्षिक सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.